# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(विशेष)

---

## दिनांक १६.०९.२०२६ बुधवार

महिला, बालक व नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी नागपूर शहर पोलिसांचा व्यापक जनजागृती उपक्रम सायबर फसवणुकीपासून बालसुरक्षेपर्यंत विविध विषयांवर नागरिकांशी थेट संवाद; 375 ते 473 नागरिकांचा सहभाग

महिला, मुली, बालक, विद्यार्थी, पालक आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये सुरक्षितता, कायदे, सायबर गुन्हे, सोशल मीडिया, अमली पदार्थ, वाहतूक सुरक्षा आणि महिलांविषयीच्या गुन्ह्यांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी नागपूर शहर पोलिसांकडून 'पोलीस दीदी' व 'पोलीस काका' उपक्रमांतर्गत व्यापक जनजागृती अभियान राबविण्यात आले.

दि. 13 ते 16 सप्टेंबर 2026 या कालावधीत सिताबर्डी, कळमना, वाठोडा, जरीपटका, बजाजनगर व खापरखेडा पोलीस ठाण्यांच्या हद्दीत विविध ठिकाणी कॉर्नर मीटिंग, संवाद कार्यक्रम, Awareness Programs आणि प्रत्यक्ष जनजागृती उपक्रम घेण्यात आले.

शाळा-महाविद्यालये, गणेशोत्सवाचे ठिकाण, मंदिर परिसर, बाजारपेठा, झोपडपट्टी परिसर, सार्वजनिक ठिकाणे तसेच नागरिकांच्या गर्दीच्या ठिकाणी पोलिसांनी नागरिकांशी थेट संवाद साधला. उपलब्ध नोंदीनुसार या उपक्रमांमध्ये किमान 375 ते कमाल 473 नागरिक, महिला, पुरुष, बालके, पालक, शिक्षक व विद्यार्थी सहभागी झाले, तर ज्या दोन कार्यक्रमांमध्ये उपस्थितीची अचूक संख्या नोंदविण्यात आलेली नाही, त्यामुळे प्रत्यक्ष लाभार्थी संख्या यापेक्षा अधिक आहे.

**सायबर गुन्ह्यांविरोधात 'डिजिटल सावधगिरी' चा संदेश**

डिजिटल व्यवहार आणि सोशल मीडिया वापर वाढत असताना नागरिकांना सायबर सुरक्षिततेचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.

**नागरिकांना विशेषतः–**

OTP, PIN, Password किंवा बँकिंग माहिती कोणालाही सांगू नये.
अनोळखी लिंक, QR Code किंवा संशयास्पद वेबसाइटवर क्लिक करू नये.
अनोळखी व्यक्तींचे Video Call किंवा Social Media Requests स्वीकारताना काळजी घ्यावी.
बनावट Social Media Profile, Fake Account आणि ऑनलाइन ओळखीतून होणाऱ्या फसवणुकीपासून सावध राहावे.
अनोळखी व्यक्तीच्या सांगण्यावरून पैसे Transfer करू नयेत.
वैयक्तिक फोटो, व्हिडिओ किंवा कागदपत्रे अनोळखी व्यक्तींना पाठवू नयेत.
संशयास्पद Loan Apps, Investment Offers आणि आकर्षक आर्थिक आमिषांपासून सावध राहावे.
ऑनलाइन फसवणूक झाल्यास व्यवहाराचे Screenshot, Messages व इतर डिजिटल पुरावे सुरक्षित ठेवावेत.

ऑनलाइन आर्थिक फसवणूक झाल्यास वेळ न दवडता 1930 वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले. फसवणुकीनंतरचा प्रत्येक क्षण महत्त्वाचा असल्याने तात्काळ तक्रार करण्याचे महत्त्व नागरिकांना समजावून सांगण्यात आले.

**महिला व मुलींच्या सुरक्षिततेवर विशेष भर**

महिला व मुलींना छेडछाड, पाठलाग, धमकी, त्रास किंवा अन्य प्रकारचा छळ सहन न करता तात्काळ पालक, शिक्षक अथवा पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले.

अनोळखी व्यक्तीने जवळीक साधण्याचा प्रयत्न करणे, सतत पाठलाग करणे किंवा सोशल मीडियावर त्रास देणे अशा घटनांकडे दुर्लक्ष न करता तत्काळ पोलिसांशी संपर्क साधण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

**बालकांच्या सुरक्षेसाठी विशेष जनजागृती**

बालकांवरील लैंगिक अत्याचार, शोषण आणि बालकांचा गुन्ह्यांसाठी होणारा गैरवापर याबाबत POCSO कायद्याची माहिती देण्यात आली.

बालकांना Good Touch – Bad Touch / Safe Touch – Unsafe Touch यातील फरक समजावून सांगण्यात आला. कोणताही चुकीचा अनुभव आल्यास तो लपवून न ठेवता विश्वासातील व्यक्तीला सांगण्याचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले.

अल्पवयीन मुला-मुलींनी घरातून पळून जाणे, अनोळखी व्यक्तींच्या संपर्कात येणे किंवा निर्जन ठिकाणी जाणे यामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य धोक्यांबाबतही पालक व विद्यार्थ्यांना जागरूक करण्यात आले.

**सोशल मीडिया : 'Think Before You Click'चा संदेश**

Facebook, Instagram आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर वैयक्तिक माहिती शेअर करताना काळजी घेणे, Account Privacy योग्य ठेवणे, अनोळखी व्यक्तींशी ऑनलाइन मैत्री करताना सावध राहणे आणि फोटो/व्हिडिओचा गैरवापर झाल्यास तात्काळ पोलिसांना माहिती देणे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

विशेषतः 'ऑनलाइन ओळख म्हणजे नेहमीच खरी ओळख असेलच असे नाही' या बाबीकडे नागरिकांचे लक्ष वेधण्यात आले.

**अमली पदार्थांविरोधात तरुणांना जागरूकतेचा संदेश**

तरुण पिढीला दारू, तंबाखू, गुटखा, गांजा व इतर अमली पदार्थांपासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात आले. व्यसनामुळे आरोग्य, शिक्षण, कुटुंब आणि भविष्यात होणाऱ्या परिणामांची माहिती देण्यात आली.

Operation Thunder आणि Operation Shakti संदर्भातही नागरिकांना माहिती देऊन अमली पदार्थांची विक्री/सेवन, अवैध कृत्ये किंवा संशयास्पद हालचाली आढळल्यास स्वतःहून कारवाई न करता पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले.

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना विशेष सूचना**

गणेशोत्सवानिमित्त गणेश टेकडी मंदिर परिसर, गणेश मंडळे, मिरवणूक मार्ग, बाजारपेठा व इतर गर्दीच्या ठिकाणी पोलीस दीदीमार्फत नागरिकांशी संवाद साधण्यात आला.

गर्दीच्या ठिकाणी महिला व मुलींनी सतर्क राहणे, बालकांवर लक्ष ठेवणे, संशयास्पद हालचालींची माहिती पोलिसांना देणे तसेच कोणतीही अनुचित घटना घडल्यास तात्काळ मदत घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

**Road Safety बाबतही जनजागृती**

दुचाकीस्वारांनी हेल्मेट, चारचाकी वाहनातील प्रवाशांनी सीट बेल्ट वापरणे, वाहतूक नियमांचे पालन करणे आणि वाहन चालविताना मोबाईलचा वापर टाळणे याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.

**बालविवाह व महिला अत्याचाराविरोधात जागरूकता**

अल्पवयीन मुला-मुलींचे लग्न करणे कायद्याने प्रतिबंधित असल्याची माहिती देऊन बालविवाहाची माहिती मिळाल्यास संबंधित यंत्रणेला कळविण्याचे आवाहन करण्यात आले.

महिलांवरील मारहाण, धमकी, मानसिक त्रास, लैंगिक छळ आणि घरगुती हिंसाचाराविरोधात उपलब्ध कायदेशीर मदतीबाबतही नागरिकांना माहिती देण्यात आली.

**महत्त्वाचे हेल्पलाइन क्रमांक**

112 – आपत्कालीन पोलीस मदत
181 – महिला हेल्पलाइन
1098 – बाल हेल्पलाइन
1930 – सायबर क्राईम / ऑनलाइन आर्थिक फसवणूक

**नागरिकांनी सतर्क राहावे, सुरक्षित राहावे**

नागपूर शहर पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, गुन्हा घडल्यानंतर तक्रार करण्याबरोबरच गुन्हा घडू नये यासाठीही प्रत्येक नागरिकाने सजग राहणे आवश्यक आहे. महिला, बालक आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तसेच सायबर गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी नागरिकांनी पोलिसांशी सहकार्य करावे.

'सजग नागरिक – सुरक्षित समाज' या भावनेतून नागपूर शहर पोलिसांकडून जनतेशी थेट संवाद साधत अशा जनजागृती मोहिमा सातत्याने राबविण्यात येत आहेत.





स्वा/–

( नितीन चुलपार )
सहा.पोलीस निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.